<u>ख्यातनाम संगीतकार स्व. नौशाद अली यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त "स्वर रजनी" या संगीतमय कार्यक्रमाच्या आयोजन खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२१९/प्र.क्र.२०५/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :- १) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सांकासं/२५६६, दिनांक २३ जुलै, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

संगीत क्षेत्रातील अतुलनीय कामगिरी बद्दल भारत सरकारने ख्यातनाम संगीतकार स्वर्गीय नौशाद अली यांना पद्मभूषण या नागरी पुरस्काराने सन्मानित केले आहे. स्व. नौशाद अली यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून त्यांनी संगीतबध्द केलेल्या अवीट गोडीच्या लोकप्रिय गीतांचा "स्वर रजनी" हा संगीतमय कार्यक्रम दिनांक २ ऑगस्ट, २०१९ रोजी बोरीवली (पश्चिम), मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. त्याच्या आयोजनासाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

ख्यातनाम संगीतकार स्व. नौशाद अली यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून शुक्रवार, दिनांक २ ऑगस्ट, २०१९ रोजी बोरीवली (पश्चिम) मुंबई येथे, त्यांनी संगीतबध्द केलेल्या अवीट गोडीच्या लोकप्रिय गीतांचा "स्वर रजनी" हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याच्या आयोजनासाठी झालेल्या रुपये ५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) इतक्या खर्चास या शासन निर्णयाद्वारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	खर्चाचा तपशील	रुपये
१.	सभागृह भाडे	४०,०००/-
२.	गायक कलाकार मानधन (६ गायक)	९०,०००/-
३.	वादक कलाकार मानधन	६५,०००/-
४.	संयोजक मानधन	२०,०००/-
५.	कोरस गायक	५०,०००/-
६.	वरिष्ठ पत्रकार श्री. अंबरिश मिश्रा यांचे निवेदन मानधन	२०,०००/-
७.	ध्वनी व्यवस्था	३५,०००/-
८.	प्रकाश व्यवस्था	३०,०००/-
९.	कला दिग्दर्शन	३०,०००/-
१०.	निमंत्रण पत्रिका-लिफाफे छपाई	१५,०००/-
११.	रंगमंच व्यवस्था	३०,०००/-
१२.	बोर्ड, बॅनर व गेट छपाई व फिटींग खर्च	३०,०००/-
१३.	जाहिरात खर्च	४५,०००/-
	एकूण खर्च	**५,००,०००/-**

२. उपरोक्तप्रमाणे खर्च झाल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. या प्रकरणी होणारा खर्च मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (०२) राज्य, नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सव, (२२०५ १५०७) ५० इतर खर्च या लेखाशीर्षाखाली २०१९-२० या आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर प्रस्तावात वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उप विभाग-३, परिच्छेद ४ (अ) (२) (२७) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे.

६. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थसं-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ मधील परिच्छेद क्र. २ व १३ पूर्तता होत असून उर्वरित सर्व परिच्छेद व अटी या प्रकरणी लागू होत नाहीत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८१९१२४४२२४६२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.08.19 12:50:04 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई ४०० ०३२
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११.निवड नस्ती, सां.का.४.